सध्या जग हे वेगवेगळ्या प्रकारच्या दहशतवादाच्या छायेखाली जगत आहे. परिणामी सर्वसामान्य माणसाचे जीवन अशांत आणि असहाय्य बनत चालले आहे. त्याचबरोबर, युद्धामध्ये देखील अत्याधुनिक शस्त्र आणि अस्त्र यांचा वापर मानवी जीवन नष्ट करण्यासाठी सर्रास केला जात आहे. जंतुयुद्ध हा त्यातलाच एक दहशतवादाचा प्रकार आहे. वेगवेगळ्या प्रकारचे जीवाणू, विषाणू, आणि बुरशी यांवर जैविक प्रक्रिया करून त्यांची नवनवीन उत्पत्ती करून मानवाविरूद्ध वापरून केवळ स्वतःच्या राजकीय आणि सत्तापिपासू वृत्तीमुळे ही दृष्टप्रवृत्ती फोफावत चाललेली आहे. सध्या जगावर आक्रमण करणारे एच्. आय्. व्ही. पासून चिकुनगुनिया, स्वाईन फ्ल्यू इ. वेगवेगळ्या प्रकारच्या विषाणूंचा वाढता प्रादुर्भाव पाहता, हा दहशतवाद भविष्यकाळात एक संकट बनू पहात आहे. या संधीचा फायदा वेगवेगळ्या औषधी कंपन्यांना मिळत आहे; आणि जगात रोज कोट्यावधी रूपयांच्या औषधांची उलाढाल होत आहे. प्रत्येक देशातील सर्वसामान्य माणूस यांत होरपळला जात आहे; आणि त्याचा खिसा व्यवस्थीत कापला जात आहे. आजारामुळे होणारे रक्तशोषण आणि औषधांमुळे होणारे आर्थिक शोषण यांत त्याची अवस्था चरकातल्या उसाच्या चिपाडाप्रमाणे होत आहे.

अशावेळी कुठे जावे ? कोणाचा आधार घ्यावा ? कोणाची मदत घ्यावी ? या शोधांत मानव वंश व्यस्त होत चालला आहे; पण या सर्व दुखन्यांवर 'होमिओपॅथी' हा एक उत्तम इलाज आहे.

सध्याच्या जगात अस्तित्वात असलेले आजार आणि भविष्यात होऊ पाहणारे एड्स् किंवा स्वाईन फ्ल्यू इ. सारखे वेगवेगळ्या विषाणूंमुळे होणारे आजार ज्यात त्यांतला विषाणू स्वतःमध्ये रचनात्मक आणि गुणात्मक बदल घडवून आणतात आणि त्यांवर कुठलीही हमखास अशी औषधयोजना अथवा लस निष्क्रीय बनते; असे आजार म्हणजे वैद्यकीय शास्त्राला एक आव्हान बनू पाहत आहे, मात्र यावर मात करण्यासाठी होमिओपॅथिक औषधेच सध्या आणि भविष्यकाळात देखील प्रभावी ठरणार आहेत. त्याचे कारण म्हणजे होमिओपॅथिक औषधे ही अँटीबायोटीक्स

(जंतूंविरूद्ध काम करणारी) किंवा अँटीव्हायरस (विषाणूंविरूद्ध काम करणारी) नसतात. होमिओपॅथिक औषधांचा प्रभाव प्रथम मानवी चैतन्यशक्तीवर (व्हाईटल फोर्स) होतो. अर्थात त्यामुळे शरीरातील रोग प्रतिकारशक्ती उत्तेजीत होऊन वेगवेगळ्या विषाणू अथवा जीवाणूंचा नायनाट होतो आणि शरीर अगदी सहज आजारमुक्त होते; शिवाय होमिओपॅथिक औषधांमुळे कुठलाही दुष्परिणाम (Side effects) होत नसल्यामुळे शरीरावर कुठलाही अतिरिक्त ताण न पडता शरीर आल्हाददायकरित्या रोगमुक्त होते.

ज्याप्रमाणे जीवाणू, विषाणू, बुरशी (Fungus) यांच्यावर होमिओपॅथिक औषधे प्रभावीपणे काम करतात; त्याचप्रमाणे शरीरांतर्गत होणाऱ्या विविध व्याधींवर उदा. हृदयविकार, यकृत विकार, ब्लड प्रेशर, किडनी विकार, दमा, त्वचेचे विकार, डायबिटीस इ. वर होमिओपॅथिक औषधे अतिशय प्रभावीपणे काम करतात.

शरीरांतर्गत झालेल्या पेशीजालीय (Cellular structural) बदलांमुळे, पेशींमध्ये रचनात्मक बदल घडून येऊन, शरीरविज्ञानाच्या (Physiology) कार्यात असंबद्धता येते आणि आजार घटण्याऐवजी वाढत जातो. आणि या वाढत्या आजाराला होमिओपॅथिक औषधे रोखू शकतात. त्यामुळे कुठल्याही प्रकारच्या reversible किंवा irreversible आजारांमध्ये होमिओपॅथिक औषधे, चैतन्यशक्तीला जागृत करून ह्या चैतन्यशक्तीमार्फत शरीरात पुन्हा सुसूत्रता, सुसंबद्धता आणि प्रतीकार क्षमता वाढवून आरोग्याची पुनःस्थापना करू शकतात.

सुक्ष्म आणि शक्तीशाली होमिओपॅथिक औषधे, सुक्ष्म अशा पेशीअंतर्गत कार्यात मदतीच हात देऊन रचनात्मक बदल घडवून आणू शकतात. कुठल्याही प्रकारच्या आजारावर मात करण्याची क्षमता होमिओपॅथिक औषधांत असल्यामुळे होमिओपॅथी जनमानसांत विलक्षण लोकप्रिय होऊ पहात आहे. होमिओपॅथीचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार होण्याची आज गरज आहे.

होमिओपॅथिक औषधे भयग्रस्त मानव समाजाला निर्भय बनवण्यासाठी अत्यंत उत्सुक आहेत; फक्त त्यासाठी शास्त्रशुद्ध (Classical) होमिओपॅथिक चिकित्सकाची आवश्यकता आहे. या मासीकाद्वारे 'अमूल्य' आणि 'अमृततुल्य' अशा होमिओपॅथिक औषधांचा प्रभाव वेगवेगळ्या आजारांवर कसा होतो, याविषयीची लेखमाला जनसामान्यांपर्यंत पोहोचेल असा प्रयत्न मी आणि माझे विद्यार्थी आणि सहकारी करीत आहोत.

होमिओपॅथीद्वारे होणारी रूग्णसेवा ही जलद, मृदुल आणि सहज आरोग्याची पुनःस्थापना करणारी आहे आणि त्याचबरोबर कुठलेही हिंसात्मक उपचार न करता केवळ अहिंसक पद्धतीने चालणारी ही चिकित्सापद्धत जनसामान्यांमध्ये लोकप्रिय व्हावी हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

- डॉ. अमरसिंह निकम.